PRAVARA MEDICAL TRUST
SERVICE TO RURAL PEOPLE
प्रवरा मेडीकल ट्रस्टचे
आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज
आयुर्वेद कॉलेज कॅम्पस, शेवगांव जि.अहमदनगर (महा.) ४१४५०२
फोन : ०२४२९-२२३०३१,२२१९६६ फॅक्स-०२४२९-२२३३९९ E-mail : pravara_acscs@rediffmail.com
PRAVARA MEDICAL TRUST'S ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE SHEVGAON

# सांस्कृतिक विभाग अहवाल २०२३-२४

शै. वर्ष २०२३/२४ मध्ये दि.१७ ऑगस्ट २०२३ च्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या पत्रानुसार सांस्कृतिक समन्वयक म्हणून जबाबदारी प्रा.ससे केशव काकासाहेब यांच्या कडे सोपविण्यात आली. या कमिटीच्या सदस्य पदावर प्रा.कसबे बाळासाहेब , प्रा.एकशिंगे ऋतूजा , प्रा.राऊत सरीता , प्रा.काटे अश्विनी यांची निवड करण्यात आली.

- **नाट्य प्रशिक्षण कार्यशाळा:**

सांस्कृतिक विभागाच्या वतीने दि . १७ व १८ ऑगस्ट२०२३ या कालावधीमध्ये नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. शाम शिंदे , सप्तरंग थिएटर्स अहमदनगर व श्री. संकेत खेडकर, संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हे उपस्थित होते.डॉ. शाम शिंदे व श्री संकेत खेडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाच्या रुपाने मूकनाट्य या विषयावर प्रशिक्षण दिले. तसेच या कार्यक्रमांमध्ये श्री. फिरोज काझी व श्री दादा नवघरे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- **गणेशोत्सव:**

सांस्कृतिक विभागाच्या वतीने दि. २० ते२७/०९/२०२३ या कालावधीमध्ये महाविद्यालयात गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवामध्ये रांगोळी स्पर्धा , मेहंदी स्पर्धा , पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा,प्रश्नमंजुषा स्पर्धा व ए-गेमिंग स्पर्धा अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

- **स्वररंग २०२३-२४:**

सांस्कृतिक विभागाच्या अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे , विद्यार्थी विकास मंडळ आयोजित अहमदनगर विभागीयआंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'स्वररंग २०२३-२४' साठी अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय , संगमनेर येथे दि.२६/०९/२०२३रोजी विद्यार्थी सहभागी झाले.या स्पर्धेसाठी भोसले संतोष, अथर्व बटुळे, गुंते अपर्णा, दसपुते ज्ञानेश्वरी, कुऱ्हे शिवानी, बिडकर नेहा, बडे अमोल, शेळके अकाश , श्रुती लाटे, बडधे सिद्धांत या विद्यार्थ्यांनी "एका लग्नाची ३५शी...." या एकांकिकेमध्ये सहभाग घेतला व या एकांकिकेसाठी जिल्हास्तरीय विभागीय अंतर महाविद्यालय युवक महोत्सव या स्पर्धेसाठी द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.तसेच गारपगारे प्रियंका व वावरे प्रविण या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदवला.

❖ **सिंधु सांस्कृतिक महोत्सव २०२३-२४:**

महाविद्यालय सांस्कृतिक विभागाच्या वतीने दि.०१ फेब्रुवरी ते ०९ फेब्रुवरी२०२४ या कालावधीमध्ये "सिंधू सांस्कृतिक महोत्सव २०२३-२४ " या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले.या स्नेहसंमेलना मध्ये भारताची सांस्कृतिक विविधता, महाराष्ट्राची लोकधारा, बॉलीवूड व ट्रेझर हंट, अभिरूप निवडणूक अशा विविध दिनांचे आयोजन करण्यात आले. तसेच दिनांक ०८/०२/ २०२४ रोजी रंगमंचीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये गायन, रिमिक्स लावणी, फनी डान्स, सोलो डान्स, सोलो मिक्स डान्स, सोलो ग्रुप डान्स, शिवकालीन मर्दानी खेळ, नाटिका, लावणी अशा विविध कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.